७

प्रति:
१. मा. आयुक्त यांच्याकडील दिनांक ०६/०८/२०१३ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८, कामगार कल्याण विभाग
क्रमांक - काक/३/कावि/५५/२०१३
दिनांक - १२/०८/२०१३

विषय :- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ ची पुर्तता करणेबाबत.

आदेश,

मा. कामगार व कायदा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक ८.०१.२०११ राजपत्र(The Gazete of India) प्रसिध्द केलेले आहे. या राजपत्रानुसार भविष्य निर्वाह कायदा १९५२ ची अंमलबजावणी महानगरपालिकेस बंधनकारक आहे. या कायदयानुसार प्रत्येक संस्थेस भविष्य निर्वाह निधी कोड नंबर लागू करण्यात आलेला आहे. या कायदयाच्या तरतुंदीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य मालक(Principle Employer) म्हणून महानगरपालिकेची आहे. यातील मुख्य तरतुदी म्हणून महानगरपालिकेच्या अधिन असणा-या सर्व कर्मचा-यांचा/कामगारांचा तसेच कंत्राटी कामगार, तात्पुरत्या स्वरुपाचे कामगार, घंटागाडी कामगार, बदली कामगार, कॉन्ट्रक्ट कामगार, शिकाऊ कामगार इत्यादी प्रत्येक्ष अथवा अप्रत्यक्षपणे महानगरपालिकेसाठी काम करणारे अथवा महानगरपालिकेतर्फे लावण्यात येणा-या सर्व कर्मचा-यांचा/कामगारांचा समावेश होतो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर काम करणा-या आस्थेपनेवर काम करणा-या सर्व कर्मचारी/अधिकारी यांचा समावेश जी.पी.एफ.( GPF) या स्किममध्ये करण्यात आलेला असून याबाबत महानगरपालिकेकडून पालन करण्यात येत आहे. तथापि ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या कामांवर नेमण्यात आलेले कामगार अथवा ठेकेदारांने नेमलेल्या कामगांराच्या पी.एफ. वसूलीबाबत आणखी सुधारणा होणे आवश्यक आहे. याबाबत संबधीत विभागास वारंवार परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे. भविष्य निर्वाह निधी कायदयाची तथापि संबधीत विभागाकडून याबाबत प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून महानगरपालिकेस वेळोवेळी नोटिसा प्राप्त होत आहेत. भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील तरतुदींची संपुर्ण अंमलबजावणी न झाल्यास फौजदारी दंड संहितेखाली महानगरपालिकेवर फौजदारी खटला दाखला होतो तसेच या कायदयातील तरतुदीनुसार न्यायालयीन प्रक्रीयेस सामोरे जावे लागते. त्यामुळे ज्या ठेकेदारांनी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून स्वतंत्र कोड नंबर घेतले आहेत त्यांनी नेमलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी कामगारांच्या नांवानिशी भविष्य

निर्वाह निधी कार्यालयाकडे भरल्याबाबतची चलने संबधीत विभागांकडे जमा करणे आवश्यक आहे. अशी चलने प्राप्त करुन घेतल्यानंतरच संबधीत विभागांनी ठेकेदारांची देयके अदा करावीत. तसेच ज्या ठेकेदारांना भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून स्वतंत्र कोड नंबर प्राप्त झालेले नाहीत त्यांनी नेमलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी (कामगार १२ टक्के अधिक मालक १३.६१ टक्के मिळून २५.६१ टक्के) संबधीत कंत्राटदारांच्या बिलातून कपात करुन घेतल्यानंतरच त्यांना देयके अदा करण्याची दक्षता घ्यावी.

सबब, सर्व विभागप्रमुखांना या आदेशान्वये कळविण्यात येते की, भविष्य निर्वाह निधी कायदयाची पुर्तता न करता कंत्राटदारांची बिले मंजूर करणा-या विभाग प्रमुखांना जबाबदार धरुन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. त्यामुळे कंत्राटदारांमार्फत नियुक्त कामगारांचा भविष्य निर्वाह निधीबाबतची पुर्तता केल्याशिवाय कंत्राटदारांची बिले मंजूर करु नयेत. त्याचप्रमाणे लेखा विभागाने त्यांच्याकडे प्राप्त होणा-या बिलासोबत भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरल्याबाबतचा संबधीत विभाग प्रमुखांचा स्वतंत्र दाखला असल्याशिवाय कंत्राटदारांची बिले मंजूर करु नयेत.

अति.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रतिलिपी :- १) संबधीत विभाग प्रमुख
------------------------------
------------------------------
२) लेखा विभाग
२/- भविष्य निर्वाह निधीचे काम लेखा विषयक सांखीकी व आर्थीक स्वरुपाचे असल्याने याबाबतचे सर्व कामकाज लेखा विभागाच्या नियंत्रणाखाली देण्यात येत आहे. त्यामुळे लेखा विभागाने संबधीत कंत्राटदारांच्या बिलातून वसूल केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे महानगरपालिका कोड नंबरवर जमा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

ksEpf1952adesh